# हिंगोली जिल्हा पोलीस
## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.
दिनांक २७.०१.२०२५

# हिंगोली जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळाबाबत नागरीकांनी दिले अभिप्राय

हिंगोली पोलीस दलामार्फत नागरिकांचे अडीअडचणी सोडविण्यासाठी व हिंगोली जिल्हा पोलीस दलाची माहिती सहज उपलब्ध होण्यासाठी हिंगोली पोलीस या संकेस्थळाबाबत सामान्य नागरीक, विद्यार्थी, व्यापारी यांचे मध्ये जाउन जनजागृती केली त्याअनुषंगाने नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी संकेतस्थळाला भेट दिली.

संकेतस्थळ नागरीकांना हाताळणे योग्य आहे किंवा कसे? तसेच संकेतस्थळामध्ये अजुन काही बदल करावयाचे असल्यास त्याबाबत त्यांचे अभिप्राय घेतले. एकुण ४३ नागरीकांनी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिप्राय दिले. यामध्ये हिंगोली पोलीस दलाचे संकेतस्थळ हे अर्थपुर्ण आहे. तसेच नागरिकांना पाहिजे असलेली माहिती संकेतस्थळावर नागरीक सहजरित्या पाहु शकतात. तसेच संकेतस्थळ हे मदत करण्यायोग्य आहे. याबाबत अभिप्राय घेतले त्या अनुषंगाने ४३ नागरीकांपैकी उर्वरीत ३५ नागरीकांनी हिंगोली जिल्हा पोलीस संकेतस्थळाला ०५ स्टार रेटिंग केली आहे. ०७ नागरीकांनी ०४ स्टार रेटिंग केली आहे. ०१ नागरिकाने ०३ स्टार रेटिंग केली आहे. तसेच हिंगोली पोलीस दलाचे संकेतस्थळ नागरिकांना हाताळण्या योग्य आहे असे सांगीतले आहे.



जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली